आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । गुरुवार, १४ जानेवारी २०२१ । वर्ष : ३ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — पुरवणी अंक । पाने : ४ । मूल्य २ ₹



## केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांची प्रकृती स्थिर

पणजी : केंद्रीय आयुषमंत्री श्रीपाद नाईक हे सोमवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झाले होते. तर त्यांच्या पत्नी विजया नाईक यांच्यासह स्वीय सहायक दीपक घुमे यांचा मृत्यू झाला. कर्नाटकातील हिल्लर–होसकांबी या ठिकाणी हा अपघात घडला होता. दरम्यान, श्रीपाद नाईक यांची प्रकृती स्थिर आहे. त्यांच्यावर गोवा मेडिकल कॉलेजमधील आयसीयूत उपचार सुरु असल्याची माहिती गोव्याचे मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांनी दिली आहे.

# ‘तो’ आरोप बदनाम करण्यासाठीच

## गंभीर आरोपानंतर धनंजय मुंडेंचे स्पष्टीकरण

▶ प्रतिनिधी

मुंबई : राज्याचे सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री तथा बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर एका महिलेने बलात्कारासारखा गंभीर आरोप केल्यानंतर या प्रकरणी मुंडे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. आपल्यावर करण्यात आलेले आरोप केवळ बदनाम करण्यासाठी व ब्लॅकमेल करण्यासाठी आहेत, अशा शब्दांत मुंडे यांनी सोशल मिडीयावर आपली बाजू मांडली आहे.

मुंबईतील ओशिवरा पोलीस ठाण्यात एका महिलेने धनंजय मुंडे यांच्याविरोधात तक्रार अर्ज दिला होता. या प्रकरणानंतर धनंजय मुंडेंनी खुलासा केला आहे. मंगळवारपासून समाज माध्यमांमधून माझ्याविषयी काही कागदपत्र प्रसारित होत असल्याचे तसेच मीडिया व सोशल मिडियाद्वारे माझ्यावर बलात्काराचे आरोप करण्यात येत आहेत. सदर प्रकरणी एका महिलेने स्वतः त्यांच्या खात्यावरून ट्विट केले आहे. माझ्याविरुद्ध काही तक्रार दाखल केल्याचा उल्लेख त्या कागदपत्रांमध्ये दिसून येतो . हे सर्व आरोप खोटे माझी बदनामी करणारे आणि मला ब्लॅंकमेल करणारे आहेत, असं खुलासा मुंडे यांनी केला आहे.

’एका महिलेसोबत मी २००३ पासून परस्पर सहमतीने संबंधांत होतो. ही बाब माझे कुटुंबीय, पत्नी व मित्र परिवार यांना अवगत होती. सदर परस्पर सहमतीच्या संबंधामधून आम्हाला एक मुलगा व एक मुलगी अशी दोन मुले झाली. सदर दोन्ही मुलांना मी माझे नाव दिले आहे. शाळेच्या दाखल्यापासून ते सर्व कागदपत्रांमध्ये या मुलांना पालक म्हणून माझेच नाव आहे, ही मुले माझ्यासोबतच राहतात. माझे कुटुंबीय, पत्नी आणि माझी मुले यांनी देखील या मुलांना कुटुंबीय म्हणून सामावून घेतले असून स्वीकृती दिलेली आहे, असेही या पोस्टमध्ये म्हटले आहे.

’सदर महिला माझ्या मुलांची माता असल्यामुळे त्यांची मी सर्वोतोपरी



पालनपोषणाची जबाबदारी स्वीकारली आहे. मात्र, २०१९ पासून सदर महिला व त्यांची बहीण यांनी मला ब्लॅंकमेल करुन पैशाची मागणी करण्यास सुरुवात केली. माझ्या जीवाला गंभीर शारीरिक इजा करण्याच्या, धोका करण्याच्या धमक्या सुद्धा देण्यात आल्या. या सर्व प्रक्रियेत त्यांचा भाऊ ब्रिजेश शर्मा देखील सहभागी होता. या बाबत १२ नोव्हेंबर २०२० रोजी मे २०१९ पासून घडत असलेल्या या सर्व बाबींसंदर्भात पोलीसांकडे तक्रार सुद्धा देण्यात आलेली आहे,’ अशी माहिती त्यांनी दिली आहे.

’तक्रारदार महिलेने माझ्या विरुद्ध खोटे आणि बदनामीकारक व माझ्यावर लग्नाच्या बहाण्याने बलात्कार केल्याचा आरोप केल्याची पोस्ट प्रसारित करण्यास सुरुवात केली आहे. तसेच त्यांनी या संदर्भात विविध प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारीच्या प्रति देखील समाज माध्यमातून प्रसारित केल्या आहेत. या सर्व तक्रारी खोट्या आहेत. मला ब्लॅंकमेल करणे व माझ्याकडून खंडणी वसूल करण्याच्याच योजनेचा एक भाग आहे,’ असेही त्यांनी म्हटले आहे.

## ‘आदित्य’च्या उद्‍घाटनाला आमदार रोहित पवार

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथे नव्याने सुरू होत असलेल्या आदित्य एन्टरप्रायजेस फर्निचर ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्सच्या उद्घाटनाला लोकप्रिय आमदार रोहित पवार उपस्थित राहणार असल्याची माहिती आदित्य उद्योग समूहाचे संचालक प्रविण घाडगे यांनी ’वर्तमान’ शी बोलताना दिली आहे.




शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकात नव्याने सुरू होणाऱ्या या फर्मचे दि.१६ जानेवारी रोजी उद्घाटन होत आहे. या उद्घाटन सोहळ्याला कर्जत–जामखेड मतदारसंघाचे लाडके आमदार रोहित पवार उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके उपस्थित राहतील. तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये भाजप नेते रमेश आडसकर, माजी जि.प.अध्यक्ष विजयसिंह पंडीत, बांधकाम सभापती जयसिंग सोळंके, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक, सभापती कल्याण आबुज, माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ, माधव निर्मळ, सुरेंद्र रेदासणी, राजकिशोर मोदी, अरूण राऊत, आप्पासाहेब जाधव, विठ्ठल माने आदींची उपस्थिती राहणार आहे. तरी सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन शोभा प्रविण घाडगे, अनिल शेंडगे, प्रविण घाडगे, नारायण शेजुळ, अतुल शेंडगे यांनी केले आहे.


## तुळजाभवानी अर्बनकडून मोफत आरोग्य तपासणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटतर्फे रविवार दि.१७ जानेवारी रोजी सकाळी १० ते सायं. ४ वाजेपर्यंत महिलांसाठी मोफत तपासणी, उपचार आणि मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, या आरोग्य शिबिराचा महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन तुळजाभवानी अर्बनतर्फे करण्यात आले आहे.

महिलांसाठी मोफत शिबिरात बार्शी येथील कॅन्सरतज्ज्ञ डॉ. नंदकुमार पानसे, डॉ.प्रतिभा मुळे, डॉ.विजया दुलांगे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.अंजली मुंडे, वंधत्व तज्ज्ञ नंदकुमार मोरे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. अर्चना मोरे, डॉ.अंजली अकोलकर, डॉ.प्रिती रूद्रवार आदी तज्ज्ञ डॉक्टर्स या शिबिरात तपासणी करून मार्गदर्शन करतील. वंधत्व निवारण, कॅन्सरसह महिलांच्या विविध आजारांवर यावेळी तपासणी आणि उपचार केले जातील.



# अठरापगड जातींना जोडणारा दुवा

**माजलगाव मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार प्रकाश सोळंके यांचा १४ जानेवारी हा वाढदिवस; त्यानुषंगाने जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती कल्याण आबुज यांचा हा विशेष लेख ’वर्तमान’च्या वाचकांसाठी देत आहोत.**

सन २००२ च्या खानापूर ग्रामपंचायत निवडणुकीपासून ग्रामपातळीपासून माझ्या राजकीय कारकीर्दीस प्रारंभ झाला. तेंव्हापासून माजलगाव मतदारसंघाचे भाग्यविधाते प्रकाशदादा सोळंके यांच्या विचाराने भारावून गेलो तो आजतागायत. प्रकाशदादा सोळंके यांनी जातीपातीच्या राजकारणाला कधीच थारा दिला नाही. एक सर्व समावेशक व्यक्तीमत्व म्हणून प्रकाशदादा सोळंके यांच्याकडे पाहिले जाते. एक व्यापक राजकारणी म्हणून माझ्यासारख्या अनेक सामान्य कार्यकर्त्यांसाठी प्रकाशदादा सोळंके सदैव आदर्शवत, प्रेरणादायी व्यक्तीमत्व आहेत. चौफेर विकास करणारे प्रकाश सोळंके अठरापगड जातींना बरोबर घेऊन राजकारण करत आहेत. कदाचित त्यांचा राजकारणाचा हाच केंद्रबिंदू म्हणावा लागेल.

माजलगाव पंचायत समितीचे सभापती ते राज्याचे मंत्री हा प्रकाशदादा सोळंके यांचा राजकीय प्रवास विकासाभिमुख राहिलेला आहे. विकास आणि जनतेचे कल्याण साधणारे प्रकाशदादा माझ्यासारख्या अनेक तरूण कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरलेले आहेत. एक कुशल संघटक आणि विकासाचा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून प्रकाशदादा सोळंके यांचे राजकारण पुढे जात आहेत. प्रकाशदादा सोळंके यांना माजलगाव मतदारसंघाचे भाग्यविधाते का? म्हणतात याचे कोडे त्यांच्या समवेत काम केल्यासच लक्षात येते हा माझा स्वानुभव आहे. विकासाच्या मुद्यावर कसलीच तडजोड प्रकाशदादांना मान्य नसते हे मी अनेकदा अनुभवले आहे. युवकांना मानाचे स्थान मिळावे, यासाठी प्रकाशदादा सोळंके नेहमी आग्रही असतात. अगदी ग्रामपंचायत पातळीपासून स्थानिक स्वराज्य संस्था, कृषी उत्पन्न बाजार समित्या, नगरपालिका, खरेदी–विक्री संघ, नगर पंचायतीसह विविध संस्थांवर युवकांना संधी देण्यात आली.

**विकासाभिमुख नेतृत्व :** प्रकाशदादा सोळंके हे बीड जिल्ह्याच्या राजकीय पटलावर विकासाभिमुख नेतृत्व आहे. माजलगाव मतदारसंघ तीन तालुक्यांचा आहे. केवळ माजलगावच नव्हे तर धारूर, वडवणी तालुक्यांच्या विकासासाठी प्रकाशदादा आग्रही असतात. गावोगावी समाज मंदिरे, सभामंडप, अंगणवाडी, शाळेच्या इमारती, गावाअंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा योजना राबवून ग्रामीण भागात विकासाची गंगा पोहोचली पाहिजे हा दृष्टीकोन प्रकाशदादा यांच्या ठायी आहे. ग्रामीण भागातील कार्यकर्ता मोठा झाला पाहिजे, यावर प्रकाशदादा यांचा भर असतो.

**प्रकल्प महर्षी :** पंचायत समिती सभापती ते राज्याचे मंत्री असा प्रकाशदादा सोळंके यांच्या राजकारणाचा चढता क्रम लागतो. सत्तेत कोणतेही पद मिळाले तरी त्यांचा जनतेच्या विकासासाठी सदुपयोग करणे याला प्रकाशदादा सोळंके प्राधान्य देतात. विकासमहर्षी तथा महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री सुंदररावजी सोळंके यांच्या समाजकारण, राजकारणाचा वसा आणि वारसा प्रकाशदादा सोळंके समर्थपणे पेलवत आहेत. सुंदररावजी सोळंके यांच्या प्रमाणेच विकासाचे प्रकल्प राबविण्यावर प्रकाशदादा सोळंके यांचा भर आहे. अनेक ठिकाणी गोदावरी नदीवर बंधारे बांधली. त्यात ढालेगाव, सादोळा, तारूगव्हाण, राजेटाकळी आदी ठिकाणी बंधारे बांधून हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली आणून शेकडो शेतकऱ्यांच्या जीवनात हरित क्रांती आणली आहे. सोन्नाखोटा प्रकल्प, लोणी–सावंगी उपसा जलसिंचन योजना मार्गी लावण्यासाठी प्रकाशदादा सोळंके यांना विकासाच्या बाबतीत प्रकल्प महर्षी म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

**हजारो बेरोजगारांच्या हाताला काम :** प्रकाशदादा सोळंके यांचे राजकारण विकासाला धरून आहे. हजारो युवकांच्या हाताला हक्काचे काम देवून त्यांच्या संसारात आनंद निर्माण करण्याचे काम प्रकाश सोळंके करत आले आहेत. तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यामुळे परिसरातील शेतकरी सुखी



### निमित्त

### कल्याण आबुज

झाला आहे. गेल्या ३० वर्षापासून हा साखर कारखाना प्रगती पथावर आहे. शेतमजूर, शेतकरी विकासाच्या प्रवाहात आणला आहे. साखर कारखान्यामुळे अनेकांच्या जीवनात विकासाची गंगा आणली आहे.

**११५ कोटींचा निधी आणला :** प्रकाशदादा सोळंके राज्याचे पुनर्वसन मंत्री असताना माजलगाव धरणाच्या कार्यक्षेत्रात पुनर्वसन झालेल्या २२ गावांच्या सर्वांगीण विकासासाठी तब्बल ११५ कोटींचा निधी खेचून आणला. या निधीमधून २२ गावांचा विकास केला.

**प्रशस्त इमारती उभारल्या :** प्रकाशदादा सोळंके यांनी प्रशासकीय कामांना गती मिळावी म्हणून खूप प्रयत्न केले. जीर्ण इमारती झाल्याने नव्या प्रशस्त इमारती उभारल्या. त्यात तहसिल कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, न्यायालय इमारत, प्रशासकीय अधिकाऱ्यांची निवासस्थाने, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, आयटीआय कॉलेज, मुलींचे वसतिगृह आदी इमारती नव्या जागेत प्रशस्त उभारला. त्याचप्रमाणे उपजिल्हा रूग्णालयासाठी आमदार प्रकाश सोळंके यांचा पाठपुरावा सुरू आहे. शैक्षणिक पातळीवर मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची द्वारे खुली केली. सिंदफणा पब्लिक स्कूलच्या माध्यमातून दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण दिले जात आहे. अशा या बहुआयामी व्यक्तीमत्वाला राजकारणात याहीपेक्षा मोठे यश मिळो, दीर्घायुष्य लाभो याच वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो.

(लेखक : बीड जिल्हा परिषदेत समाजकल्याण सभापती आहेत.)